MHKO030093472024

## कोल्हापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात, न्यायालय क्रमांक १४, कोल्हापूर.

**(पिठासीन अधिकारी शिल्पा वि. कुलकर्णी)**

**सं.फौ.ख.क्र.६७४३/२०२४.** **नि.क्र.०८/क सोबत.**

## न्या य नि र्ण य

**(पारीत दि.०५ मे, २०२६ रोजी.)**

प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत-

| अ.क्र. | मु द्दा | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| **०१.** | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, दि.०६/०४/२०२४ रोजी रात्री १९.१० वा.चे सुमारास कृष्णात हंकारे याच्या पडक्या शेडच्या बाजुला आडोश्याला उघडयावर शेणवडे, ता.गगनबावडाख् जि.कोल्हापूर येथे आरोपी हा त्याच्या ताब्यात विना परवाना, बेकायदेशीर दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेला असताना मिळून आला ? | **नाही.** |
| **०२.** | आदेश काय.? | **निर्दोष मुक्तता.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक ०१ व ०२ करिता -**

**०२.** आरोपीवर असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एका

पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविली. आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे भा.नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे निवेदन निरस्त करण्यात आले. तसा आदेश नि.क्र.०१ लगत पारीत करण्यात आलेला आहे.

**०३.** साक्षीदार क्र.०१ सुनिल भिमराव मोरे (पंच) याच्या साक्षीमध्ये असे आले की, दि.०६/०४/२०२४ रोजी त्यांना गगनबावडा पोलीसांनी पंचनाम्याकामी पो.ठा. बोलाविले होते. तेथे त्यांची तयार पंचनाम्यावर सही घेतली होती. पंचनाम्यावरील अनु. क्र.०२ वर त्यांची सही (नि.क्र.१०) असून त्यातील मजकूराबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने त्याचा उलट तपास घेतला असता कोणताही गुन्हादर्शक पुरावा त्याच्या साक्षीत आलेला नाही.

**०४.** पुरावा कायद्यातील तरतुदीप्रमाणे व महाराष्ट्र दारु बंदी कायद्यातील तरतुदी प्रमाणे आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीतीच्या दृष्टीने तथाकथीत जप्त मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यात सापडला व सदरचा मुद्देमाल हा दारुच आहे हे जोपर्यंत सिध्द होत नाही तो पर्यंत आरोपीला शिक्षा होवू शकत नाही.

**०५.** सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊन देखील अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. फौजदारी खटल्यामध्ये अभियोग पक्षाने आपला खटला संशयापलीकडे सिध्द करणे आवश्यक असते व तसे करण्यास अभियोग पक्ष या खटल्यामध्ये असमर्थ ठरलेला आहे. आरोपी हा घटनेच्या दिवशी बेकायदेशीर - पणे दारु जवळ बाळगुन विक्री करत असताना मिळून आल्याचा ठोस पुराव्या अभावी गुन्हा शाबीत होत नसलेने असा निष्कर्ष निघतो की सरकार पक्ष आपली केस शंकेपली - कडे जाऊन शाबीत करण्यांस असमर्थ ठरले आहे. करिता मुद्दा क्र.०१ वर नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.०२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आ दे श</u>

**०१.** आरोपीची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**०२.** आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो व आरोपीला देखील मुक्त करण्यात येते.

**०३.** जप्त मुद्देमाल - देशी दारु पहिली धार संत्र कंपनीची एकूण ०७ बाटल्या या अपिल कालावधी संपल्यानंतर मा.राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे नियमाप्रमाणे नष्ट करण्यासाठी पाठवण्यात याव्यात.

**०४.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे रक्कम रू.१५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)*

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.05 13:51:51 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.०५/०५/२०२६.